# म्हाडाच्या विभागीय मंडळांतर्फे काढण्यात येणा-या सदनिका सोडतीत ‘पत्रकार’ संवर्गातील विजेत्या अर्जदारांनी पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी करावयाची कार्यवाही

पत्रकार संवर्गातील विजेत्या अर्जदारांनी संबंधित मंडळाकडून प्रथम सूचना पत्र (First Intimation Letter) प्राप्त झाल्यानंतर पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी **मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**, **कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, म्हाडा मुख्यालय, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१ (दूरध्वनी क्रमांक -** ०२२ ६६४०५०६६, ०२२ ६६४०५०६७, ०२२ ६६४०५०७७**)** या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत लिखित स्वरूपात अर्ज सादर करावा.

**अर्जासोबत खालील आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.**

**१)** पत्रकारितेत सलग किमान ५ वर्ष अनुभव असल्याचे प्रमाणपत्र (Experience Certificate) **किंवा** पत्रकार म्हणून काम केलेल्या संस्थेमधील नियुक्ती पत्राची (Appointment Letter) स्वसाक्षांकित छायांकित प्रत.

**२)** माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील **निव्वळ पत्रकारितेतून मिळणा-या उत्पन्नासंदर्भातील कागदपत्रांची स्वसाक्षांकित छायांकित प्रत** (वेतन प्रमाणपत्र, वेतन पावत्या, वेतन बँक खात्यावर जमा झाल्याचे बँक स्टेटमेंट/पासबुक छायांकित प्रत, मुक्त पत्रकारितेकरिता मानधन मिळाल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र)

**३)** अर्जदार सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संबंधित वृत्तपत्राच्या/वृत्तवाहिनीच्या संपादकांचे शिफारस पत्र

**४)** माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील वृत्तपत्रांत स्वत:च्या नावानाशी प्रसिद्ध/प्रकाशित (By line/ Credit line) बातम्या / लेख यांची किमान १० कात्रणे सादर करावे **किंवा**
वृत्तवाहिनीत स्वत:च्या नावानीशी प्रसारित बातम्यांची ध्वनीचित्रफित सीडी/डीव्हीडी/पेन ड्राईव्हमध्ये (१ प्रत) सादर करावी

**५)** सद्यस्थितीत अर्जदार कार्यरत संस्थेने दिलेल्या ओळखपत्राची छायांकित प्रत

**६)** स्वयंघोषणापत्र (Self declaration) **(नमुना प्रत संलग्न)**

**७)** पत्रकार म्हणून सोडतीतील विजेता/विजेती अर्जदार काम करीत असलेले दैनिक/मासिक/साप्ताहिक/नियतकालिक महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी तयार केलेल्या वृत्तपत्रांच्या शासनमान्य यादीवर असल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र.

८) संबंधित मंडळाने सोडतीत यशस्वी अर्जदाराला पाठविलेल्या प्रथम सूचना पत्राची (First Intimation Letter) छायांकित प्रत.

उपरोक्त कागदपत्रे समक्ष अथवा रजिस्टर टपालाने **मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**, **कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, म्हाडा मुख्यालय, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१** या कार्यालयात सादर केल्यानंतर सादर कागदपत्रांच्या आधारावर निर्णय घेऊन संबंधित अर्जदारांना पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भातील कार्यवाही केली जाईल.

# स्वयंघोषणापत्र (Self Declaration)

हे स्वयंघोषणापत्र दि. ___________ रोजी ________ मंडळाच्या _______ मधील सदनिका सोडतीतील विजेते अर्जदार श्री./सौ./कु. ______________________ वय ___ वर्ष राहणार (पूर्ण पत्ता) ________________________________________________________________________________________ _______

मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१ यांच्या नावे प्रस्तुत करतो / करते की, ________ गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) जाहीर सन________ सोडतीत माझा अर्ज क्रमांक (Application Number)_________ संकेत क्रमांक (Scheme Code) ____________ प्रवर्ग (Category) __________ मध्ये यशस्वी (Successful) म्हणून जाहीर करण्यात आला आहे. ________ गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने दि._________ रोजी पाठविलेल्या प्रथम सूचना पत्र क्रमांक (First Intimation Letter) ____________ नुसार मला पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. त्याकरिता सबळ पुरावा म्हणून आवश्यक कागदपत्रे जसे की, **१)** पत्रकारितेत सलग ५ वर्ष अनुभव असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र किंवा पत्रकार म्हणून काम केलेल्या संस्थेतील नियुक्ती पत्राची (Appointment Letter) स्वसाक्षांकीत छायांकित प्रत, **२)** माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील निव्वळ पत्रकारितेतून मिळणाऱ्या उत्पन्नासंदर्भातील कागदपत्रांची स्वसाक्षांकीत छायांकित प्रत (वेतन प्रमाणपत्र, वेतन पावत्या, वेतन बँक खात्यावर जमा झाल्याचे बँक स्टेटमेंट / पासबुकची छायांकित प्रत, मुक्त पत्रकारितेकरिता मानधन मिळाल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र, **३)** अर्जदार सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संबंधित वृत्तपत्राच्या / वृत्तवाहिनीच्या संपादकांचे शिफारस पत्र, **४)** माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील वृत्तपत्रांत स्वतःच्या नावानिशी प्रसिद्ध / प्रकाशित (By line / Credit Line) बातम्या / लेख यांची किमान १० कात्रणे किंवा वृत्तवाहिनीत स्वतःच्या नावानिशी प्रसारित बातम्यांची ध्वनिचित्रफीत सीडी / डीव्हीडीमध्ये (१ प्रत), **५)** सद्यस्थितीत अर्जदार कार्यरत संस्थेने दिलेल्या ओळखपत्राची छायांकित प्रत, **६)** पत्रकार म्हणून सोडतीतील विजेता/ विजेती अर्जदार काम करीत असलेले दैनिक/ मासिक/साप्ताहिक / नियतकालिक महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी तयार केलेल्या वृत्तपत्रांच्या शासनमान्य यादीवर असल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्या कार्यालयात सादर करीत असून उपरोक्त नमूद सर्व कागदपत्र / प्रमाणपत्र माझ्या माहितीप्रमाणे खरी व योग्य आहेत.

जर मी सादर केलेल्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र चुकीचे, खोटे, बनावट असल्याचे आढळून आल्यास त्याला पूर्णपणे मी जबाबदार राहील व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला (म्हाडा) मला वाटप केलेली सदनिका रद्द करण्याचा व माझ्या विरुद्ध कायदेशीर खटला सुरु करण्याचा अधिकार राहील, या कायदेशीर कार्यवाहीला केवळ मी एकटा/एकटी जबाबदार राहील.

मी याद्वारे नमूद करत आहे की, या योजनेच्या संदर्भात हे स्वयंघोषणापत्र मला आणि माझ्या कायदेशीर वारसांचे उत्तराधिकारी इत्यादींना बंधनकारक असेल.

**विजेत्या अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी** ____________________________
**ठिकाण:**
**दिनांक :**